जावक ..................

अत्यंत महत्वाचे
क्रमांक प्रशि./पो.शि.भरती/कार्यपध्दती/७१७/२०१८/ २६०८

मुंबई, दिनांक - 06 OCT 2021 /१०/२०२१

संदर्भ:- या कार्यालयाचे परिपत्रक क्र. प्रशि./पो.शि.भरती/कार्यपध्दती/७१७/२०१८/२५४६, दिनांक ०४/१०/२०२१

विषय :- पोलीस भरती - २०१९ करिता प्रमाणपत्रांचा दिनांक (Cut of date) निश्चितीबाबत.

****

उपरोक्त विषयाबाबत काही पोलीस घटक प्रमुखांकडून पोलीस भरती -२०१९ साठी प्रमाणपत्रांचा दिनांक (Cut of date) निश्चितीबाबतचे पत्र या कार्यालयास प्राप्त झालेली आहेत. तथापि नॉन क्रिमिलेअर बाबत काही पोलीस घटकांकडून अनेक मुद्दे उपस्थित होतात, त्यानुसार संदर्भाधीन दि.४.१०.२०२१ अन्वये नॉन क्रिमिलियर चे प्रमाणपत्र मार्च - २०२० पर्यंत ग्राह्य धरण्यांत यावे, असे धरण्यात यावे असे कळविण्यात आले होते. तथापि याबाबत अनेक पोलीस घटक प्रमुखांना संभ्रम निर्माण होत असल्याने नॉन क्रिमिलेअरबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राबाबत :- महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सीबीसी २०१२/प्र.क्र.१८२/विजाभज-१, दिनांक २५.०३.२०१३ मधील मुद्दा क्रमांक २ (iii) मध्ये असे नमूद केले आहे की, "एखादया पदाकरीता अर्ज दाखल करावयाची / स्विकारण्याची अंतिम तारीख किंवा त्या पदाकरीता निश्चित करण्यात आलेली विशिष्ट निर्णायक (crucial) तारीख हीच संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी गृहीत धरण्यात यावी " त्यानुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्ग वगळून उर्वरित विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी १ मार्च - २०१८ ते ३१.०३.२०१९ या वर्षातील उत्पनाच्या आधारावर २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी ग्राह्य असलेले, अर्ज दाखल करण्याच्या अंतीम दिनांकापर्यंतचे नॉन क्रिमिलेअर सर्टीफिकेट विचारात घेण्यात यावे व शासन परिपत्रक , सामान्य प्रशासन विभाग क्रमांक राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक ०६.०७.२०२१ नुसार सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गातील उमेदवारांना आर्थिकदृष्टया दुर्बल घटक आरक्षण अथवा ~~अराखीव~~ (खुला प्रवर्ग) विकल्पाबाबतच्या ईडब्ल्यूएस प्रमाण व नॉनक्रिमिलेअरचे मार्च - २०२० चे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात यावे.

(संजय कुमार)
अपर पोलीस महासंचालक,
प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई / ठाणे शहर / पुणे शहर / पिंपरी चिंचवड / नागपूर शहर / नवी मुंबई / औरंगाबाद शहर / अमरावती शहर / सोलापूर शहर व लोहमार्ग मुंबई

Scanned with CamScanner